RNI No. MAHBIL/2009/36619

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक–कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ८, अंक ७०] शुक्रवार, ऑक्टोबर २८, २०२२/कार्तिक ६, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

## असाधारण क्रमांक ११३

## प्राधिकृत प्रकाशन

## नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

### सूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) अन्वये मिरा-भाईंदर शहराच्या प्रारूप सुधारित विकास योजनेचे प्रसिद्धीकरण**

क्रमांक जा. क्र. मिभावि/ प्रासुवियो- मिरा-भाईदर/कलम २६/प्रसिद्धी/२५८७, दिनांक २७ ऑक्टोबर २०२२.— ज्याअर्थी, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने (यापुढे " उक्त नियोजन प्राधिकरण " असे निर्देशिलेली), तिच्या अधिपत्याखालील क्षेत्राची (यापुढे उक्त क्षेत्र असे उल्लेखलेली), महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे " उक्त अधिनियम " असे निर्देशिलेली) चे कलम २३ (१) व कलम ३८ मधील तरतुदीनुसार प्रारुप सुधारित विकास योजना (यापुढे " उक्त प्रारुप विकास योजना " असे उल्लेखलेली) तयार करण्याचा इरादा ठराव क्र. ७६, दिनांक १५ ऑक्टोबर २०१५ अन्वये जाहीर करून , त्याबाबतची सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्र**, कोकण विभाग भाग-२, दिनांक २६ नोव्हेंबर २०१५ रोजी प्रसिद्ध केली आहे आणि अधिनियमातील सुधारित तरतुदीनुसार, सदर इरादा दिनांक १० जानेवारी २०१८ ला घोषित झाल्याचे मानण्यात आले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतुदीस अनुसरुन आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारुप विकास योजना तयार करण्यासाठी महानगरपालिकेकडे शासनाकडील प्रतिनियुक्तीवर असलेले नगररचनाकार यांची " नगररचना अधिकारी " म्हणून आदेश क्र.मिभा/मनपा/आयुक्त-३५८/२०१५-२०१६, दिनांक १० मार्च २०१६ अन्वये नेमणूक केली ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २६ (१) अन्वये उक्त प्रारुप विकास योजना विहित मुदतीत म्हणजेच दिनांक ९ जानेवारी २०१८ पर्यंत प्रसिद्ध करण्यास उक्त नियोजन प्राधिकरण असमर्थ ठरले आहे ;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांनी त्यांचेकडील आदेश क्र. मिरा-भाईंदर मनपा/ कलम २१ (४ क)/ सहसंकोवि/ ६१२६, दिनांक २५ सप्टेंबर २०१८ अन्वये नियोजन प्राधिकरणाच्या अधिकाराचा वापर करण्यासाठी व आनुषंगिक कर्तव्ये पार पाडण्यासाठी तसेच या विकास योजना संदर्भाने कलम २६, २८ व ३० नुसार आवश्यक वैधानिक कार्यवाही पूर्ण करणेसाठी उक्त अधिनियमाच्या कलम २१ (४ क) अन्वये सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, ठाणे यांची अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे (यापुढे उक्त " नियुक्त अधिकारी " म्हणून उल्लेख करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रारुप विकास योजना, उक्त अधिनियमाच्या कलम २६ अन्वये प्रसिद्ध करण्यासाठी संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आदेश क्र. वि.यो. मिरा-भाईंदर मनपा/मुदतवाढ/कलम-२६/टीपीव्ही-३/२०८४, दिनांक २१ ऑगस्ट २०२० नुसार चे आदेशान्वये दिनांक ४ डिसेंबर २०२० हा दिवस धरून त्या दिवसापर्यंत व तदनंतर दिनांक २७ ऑक्टोबर २०२२ चे आदेशान्वये दिनांक ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत मुदतवाढ दिली आहे ;

आणि, ज्याअर्थी, उक्त नियुक्त अधिकारी यांनी उक्त प्रारुप विकास योजना तयार केली असून, नियोजन प्राधिकरण म्हणून उक्त प्रारुप विकास योजना उक्त अधिनियमाचे कलम २६ (१) नुसार प्रसिद्ध करण्यासाठी ठराव क्र. १, दिनांक २० ऑक्टोबर २०२२ पारित केलेला आहे.

त्याअर्थी, उक्त प्रारुप विकास योजना, उक्त अधिनियमाचे कलम २६ (१) अन्वये, नियुक्त अधिकारी, या नात्याने मी, निम्न स्वाक्षरीकार, नागरिकांकडून सूचना व हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध करीत आहे. सदरहू योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ, खाली नमूद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत :—

(१) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई, कक्ष क्र. ३०५, तिसरा मजला, कोकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४.

(२) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका, मिरा-भाईंदर इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), मिरा-भाईंदर (ठाणे) ४०१ १०१.

(३) सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, ३ रा मजला, कोर्ट नाका, ठाणे (प.) ४०० ६०१.

उक्त प्रारुप विकास योजनेचे नकाशे व तपशिलाच्या प्रती योग्य शुल्क आकारून नागरिकांना या कार्यालयात उपलब्ध होऊ शकतील.

उक्त प्रारुप विकास योजनेतील तरतुदीसंबंधी नागरिकांच्या काही सूचना/ हरकती असतील तर त्यांनी ही सूचना **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नियुक्त अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, ठाणे जिल्हाधिकारी, कार्यालय इमारत, ३ रा मजला, कोर्ट नाका, ठाणे (प.) ४०० ६०१ यांचे कार्यालयाकडे लेखी स्वरुपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत नियुक्त अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकतींवरच केवळ विचार करण्यात येईल.

उक्त प्रारुप विकास योजनेचे नकाशे व तपशिलाच्या प्रती योग्य ते शुल्क आकारून नागरिकांना नियुक्त अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध होऊ शकतील.

**किशोर भि. पाटील,**

नियुक्त अधिकारी,<br>
मिरा-भाईंदर विकास योजना तथा<br>
सहायक संचालक, नगररचना,<br>
ठाणे शाखा, ठाणे.

ठाणे,<br>
दिनांक २८ ऑक्टोबर २०२२.

## TOWN PLANNING AND VALUATION DEPARTMENT

### Notice

### Publication of Draft Development Plan of Mira- Bhayandar under section 26(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

No. MBD/DRDP-Mira-Bhayandar/2587, dated 27th October 2022.— Whereas, the Mira-Bhayandar Municipal Corporation (hereinafter referred to as "the said Planning Authority") *vide* resolution No. 76, dated 15th October 2015, had declared its intention to prepare a Draft Revised Development Plan of Mira-Bhayandar (hereinafter referred to as the "said Draft Development Plan") for the area under its jurisdiction, (hereinafter referred to as " the said area") as per the provision of section 23(*1*) and 38 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") and notice to that effect is published in *Maharashtra Government Gazette,* Konkan Division Supplement Part 2 on 26th November 2015 and the said intention is treated as deemed to be declared on 10th January 2018 as per amendments in the said act ;

And whereas, as per the provision in section 24 of the said Act, The Commissioner, Mira-Bhayandar Municipal Corporation *vide* order No. 358/2015-2016, dated 10th March 2016 had appointed Town Planner on Deputation in Mira-Bhayandar Municipal Corporation as "Town Planning Officer" to prepare the said Draft Development Plan for the said area ;

And whereas, the said Planning Authority has failed to publish the said Draft Development Plan under section 26(*1*) of the said Act within the time limit *i.e.* up to 9th January 2018 ;

And whereas, the Joint Director of Town Planning, Konkan Division, Navi Mumbai by his order No. 6126, dated 25th September 2018 has appointed Assistant Director of Town Planning, Thane Branch, Thane as an "Officer" as per the provisions of Sec. 21(4A) of the said Act, to exercise the powers of the said Planning Authority and complete the legal procedure required under section 26, 28 and 30 of the said Act ;

And whereas, the Director of Town Planning by his order No. DP-Mira-Bhaindar/ Extn./ U/S 26/TPV-3/2084, dated 21st August 2020 has extended the time to publish the said Draft Development Plan u/s 26 (*1*) of the said Act, upto 4th December 2020 and then by its order dated 27th October 2022 has extended the time to publish the said Draft Development Plan u/s 26 (*1*) of the said Act, upto 31st October 2022 ;

And whereas, the said Officer, has Prepared said Draft Development Plan and being Planning Authority has passed Resolution No. 1, dated 20th October 2022 to publish the said Draft Development Plan u/s 26 (*1*) of the said Act.

Therefore, I, the under signed, as an "Officer", here by Publish the said Draft Development Plan u/s 26 (*1*) of the said Act, for inviting suggestions/objections from public. The copy of the said Draft Development Plan and report thereof are kept open for inspection of the public at the following offices on all working days during office hours :—

(1) Joint Director, Town Planning, Konkan Division, Navi Mumbai, 305, 3rd Floor, Konkan Bhavan, Navi Mumbai 400 614.

(2) The Municipal Commissioner, Mira-Bhayandar Municipal Corporation.

(3) Assistant Director, Town Planning, Thane Branch, Thane, 3rd Floor, Collector Office, Court Naka Thane (West) 400 601.

The suggestions/objections, if any, in writing from public in this regard with reasons, shall be submitted to the said Officer and Assistant Director, Town Planning, Thane Branch, Thane, 3rd Floor, Collector Office, Court Naka Thane (West) 400 601, within a period of 30 days from the date of publication of this notice in the *Maharashtra Government Gazette*. Suggestions/Objections received in writing from public to the said officer within the period of 30 days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette* shall only be considered.

KISHOR B. PATIL,

Thane,
dated 28th October 2022.

Officer Appointed for
Revised Development Plan,
Thane and Assistant Director,
Town Planning, Thane Branch, Thane.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.